बातमीपत्र

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि ०१ मार्च २०२४**

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ८८/२०२४ भादवि ३२४,३२३,५०४,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २९/०२/२०२४ रोजी १५.३० वा चे सुमारास, मातंगवस्ती, जुना बोरामणी नाका, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०१/०३/२०२४ रोजी १५.५४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | बापु कुंडलिक लोंढे, वय- ४३ वर्षे, रा. मातंगवस्ती, जुना बोरामणी नाका, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) सागर शिंदे, २) भाऊ डोलारे, ३) चंद्रकांत पारखे, सर्व रा. मातंगवस्ती, जुना बोरामणी नाका, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे गल्लीतुन जात असताना वरील आरोपीत हे गल्लीत थांबलेले होते. त्यावेळी आरोपीत क्रं. १ हा फिर्यादीस शिवीगाळ करु लागला, फिर्यादी त्याला कशाला शिवीगाळ करतो असे विचारले असता, त्याने फिर्यादीस माझ्या विरुध्द पोलीसात तक्रार करता का असे म्हणून हाताने मारहाण करु लागला, त्यावेळी आरोपीत क्रं. २ व ३ यांनी देखील हाताने मारहाण केली. त्याच वेळी आरोपीत क्रं. १ याने खाली पडलेला लाकुड उचलुन फिर्यादीस पायावर व पाठीवर मारले. त्यानंतर फिर्यादी आरडा ओरड केल्यानंतर वरील आरोपीत तेथुन निघुन गेले आहेत म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ३९९ दुधाळे- ९८२३२५२५०३ |

## जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ८२/२०२४ भादवि ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २९/०२/२०२४ रोजी १७.०० वा ते १७.३० वा चे सुमारास, पुंजाल क्रिडांगण, अक्कलकोट रोड पाणी टाकी सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०१/०३/२०२४ रोजी १६.४८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | कपिल राम गड्डम, वय- ३७ वर्षे, रा. मार्कंडेय नगर, कुमठा नाका, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | : | १०,०००/- रु एक हिरो होंडा स्प्लेंडर काळा व निळा पट्टा असलेली मोटार सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची व किंमतीची मोटार सायकल ही वरील ठिकाणी पुंजाल क्रिडांगण चे कंपाऊंड च्या बाजुला लावलेली असताना, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे संमतीवाचून, मुद्दाम लबाडीने चोरुन नेली आहे म्हणून. तपास:- पोना/ १३११ बाबर- ९०११०७०७१७ |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ८४/२०२४ भादवि ४२०,४०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | सन- २०२१ रोजी पासुन ते आजपावेतो, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०१/०३/२०२४ रोजी १६.०२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | वरलक्ष्मी विजय बिटला, वय- ५० वर्षे, रा. घर नं. ७२, मंत्री चंडक आंगण हेद्राबाद रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) रईसा पटेल, २) त्यांचा मुलगा अबुतालीम पटेल, व ३) शाबुद्दीन पटेल |

| | | |
|---|---|---|
| **फसवणुक र.** | **:** | १८,२०,१४९/- रुपये असे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे घरासमोर राहणारे वरील आरोपीत यांनी सन- २०२१ मध्ये मुलीचे लग्न कार्य आहे म्हणून फिर्यादीकडुन लग्नकार्याकरीता खर्चाकरीता पैसे मागितले. त्यावेळी फिर्यादी यांनी त्यांचेवर विश्वास ठेवून २,००,०००/- व नंतर २,००,०००/- रु रोख स्वरुपात फिर्यादीचे पती यांचे समक्ष दिले. त्यानंतर अधुन मधुन फिर्यादीकडुन फोन पे व्दारे पैसे घेतले. त्यानंतर तुम्ही शेत जमिनीमध्ये पैसे गुंतवणुक करा, मी तुम्हाला कमी पैशात जमीन घेवून देते, असे म्हणून आणखी ६,७०,०००/- रु फिर्यादीची भाची यांचे कडुन दिले. त्यानंतर दि. २०/१०/२०२२ रोजी आणखी २,००,०००/- रु रोख स्वरुपात दिले. त्यानंतर वरील आरोपीतांनी शेतामध्ये खुप कामे आहेत असे सांगुन फिर्यादीचा विश्वास संपादन करुन, बचत गट काढायला लावला व फिर्यादीकडुन ७५,०००/- रु ७०,०००/- रु ५०,०००/- रु ५०,०००/- रु ५०,०००/- रु कर्ज फायनान्स व बँकेकडुन काढुन वरील रक्कम आरोपीत क्रं. १ हिस दिल्या आहेत. त्यानंतर १५/१०/२०२२ रोजी २,००,०००/- रु दि. २०/१०/२०२२ रोजी ५०,०००/- रु दि. २०/११/२०२२ रोजी ५०,०००/- रु असे बिशीतुन काढुन घेवून त्यानंतर बरेच दिवस बिशी भरले नाहीत.<br>तरी वरील आरोपीतांनी वेळोवेळी फिर्यादीचा विश्वास संपादन करुन वेगवेगळी कारणे सांगनु फिर्यादीकडुन फोन पे व्दारे तसेच रोख स्वरुपात एकुण १८,२०,१४९/- रुपये घेवून तो स्वतःच्या फायदयाकरीता वापरुन फिर्यादीची आर्थिक फसवणुक केली आहे म्हणून. तपासः- सपोनि- कुकडे- **९५७९३९९५५३** |